महाराष्ट्र शासन

# ग्रामिण रुग्णालय वैभववाडी

# तहसिलदार कार्यालयानजीक,वैभववाडी

आरोग्य सेवा

ईमेल–sindhudurg.vaibhavwadi.rhvwadi@gmail.com

जा.क्र.ग्रारुवै/आस्था/एनएचएम/आहार सेवा/ 133-34 /२६

दिनांक :- १५/०५/२०२६

## आहारसेवा पुरविणेकरिता दरपत्रक जाहिरात

विषयः- ग्रामिण रुग्णालय वैभववाडी करिता २०२६-२७ करिता आहार सेवा पुरविणे

संदर्भः- १.सार्वजनिक आरोग्य विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रशामा२०२५/प्रक्र१७१/रुशाआ-१ (ई.क्र.१२५०७३१) दि. २९ ऑक्टोबर २०२५

२.मा.सहसंचालक,आ.सेवा रुग्णालये(राज्यस्तर) मुंबई यांचे पत्र क्र१६०९३-१३६/दि.१८/११/२५

३. मा.जिल्हा शल्य चिकित्सक,जि.रु.सिंधुदुर्ग यांचेकडील पत्र क्रएनएचएम/१६८४९-६०/०४-१२-२०२५

२. दिनांक १५/०५/२०२६ रोजीची कार्यालयीन मंजूर टिपणी

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन ग्रामिण रुग्णालय वैभववाडी,ता–वैभववाडी जि–सिंधुदुर्ग या आरोग्य संस्थमध्ये दाखल आतंररुग्णांचा आहार,चहा नाष्टा आणि भोजन व्यवस्था करणेसाठी पुरवठादार दरपत्रके मागवून निश्चित करणे प्रस्तावित आहे. सदर आहार पुरविणेसाठी उपरोक्त शासन निर्णयान्वये अधिकतम दर रक्कम रु.१४५/– निश्चित करणेत आलेला आहे. सदर दरपत्रके व कंत्राट राज्यस्तरावरुन आहार विषयक निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत किंवा वरिष्ठ स्तरावरुन याबाबत प्राप्त सूचनांस अनुसरुन यापैकी जे अगोदर होईल त्याचे अधिन राहून खालिल अटी शर्तींना अधिन राहून इच्छुक पुरवठारदारांकडून मोहोदबंद पाकिटातून दरपत्रके मागविणेत येत आहेत. विहित अटी व शर्तींची पूर्तता करणा–या पुरवठादार यांनी खाली सहि करणार यांच्या नावे दरपत्रके दिनांक २२/०५/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा पध्दतीने अथवा प्रत्यक्ष वैदयकिय अधिक्षक,कार्यालय, ग्रामिण रुग्णालय वैभववाडी,ता–वैभववाडी,जि.सिंधुदुर्ग यांचे कार्यालयामध्ये आणून दयावायाची आहेत.सदर दरपत्रके त्याच दिवशी दि.२२/०५/२०२६ रोजी सायं.५.०० वाजता वैदयकिय अधिक्षक, ग्रामिण रुग्णालय वैभववाडी,ता–वैभववाडीयांचे दालनामध्ये त्यांचे अध्यक्षतेखाली उघडण्यात येतील.

**दरपत्रकाच्या अटी व शर्ती**

१) पुरवठादार संस्थेचे/मालकाचे नोंदणी प्रमाणपत्र/उदयोग प्रमाणपत्र/ जीएसटी नंबर प्रमाणपत्र यापैकी एक कागदपत्र दरपत्रकासमवेत जोडणे आवश्यक राहिल

२) पुरवठादार संस्थेचे/मालकाचे पॅनकार्ड सत्यप्रत दरपत्रकासमवेत जोडणे आवश्यक राहिल.

3) विहित मुदतीत प्राप्त न होणारी दरपत्रके ,नाकारणे तसेच आवश्यक ते सर्व बदलाबाबतचे सर्व अधिकार वैदयकिय अधिक्षक ग्रामिण रुग्णालय वैभववाडी,ता–वैभववाडी,जि–सिंधुदुर्ग यांचेजवळ राहतील .याबाबत कोणत्याही व्यक्ती अगर संस्थेला स्पष्टीकरण मागता येणार नाही .अगर न्यायालयात जाता येणार नाही.

4) दरपत्रक विहित नमुन्यात व मुदतीत या कार्यालयाकडे पोहोचणे आवश्यक आहे.

5) उशिरा प्राप्त झालेले दरपत्रक स्विकारले जाणार नाही

6) सिलबंद लखोटयावर,आहार पुरविणेसाठी दरपत्रक असा उल्लेख करावा

7) साहित्याचे दर सर्व करांसहित सन २०२६-२७ या वर्षाकरिता किंवा राज्यस्तरावरुन निविदा प्रक्रिया किंवा वरिष्ठ स्तरावरुन प्राप्त सुचनांप्रमाणेच्या कालावधी करिता राहतील.

8) दरपत्रक धारकाने सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचून आणि समजावून घेवून दरपत्रक सादर करावे. शंका असल्यास त्याबद्दल स्पष्टीकरण घ्यावे. परंतु त्यासाठी दरपत्रक सादर करण्यासाठी दिरंगाई करता येणार नाही.

Scanned with OKEN Scanner

9) दरपत्रक धारकाने आपल्या आहार पुरविणे दर अंकात आणि अक्षरात अशा दोन्ही स्वरुपात स्पष्ट करावेत. दोन्ही मध्ये फरक आढळल्यास अक्षरी दर वैध ठरविला जाईल

10) दरदत्रक सादर करताना मुद्रणात झालेली खाडाखोड साक्षांकिंत करुन पूर्ण स्वाक्षरीसह दरपत्रक धारकाने सादर करावी.

11) कंत्राटाराच्या कामगारांना कार्यालयाच्या परिक्षेत्रात येण्यासाठी सुरक्षेच्या वर्तमान कायद्यानुसार ओळखपत्र काढण्याची व सर्व सुरक्षा उपाय पाळणेची जबाबदारी मक्तेदाराची राहील. ओळखपत्राशिवाय कामगारांना कार्यालय परिक्षेत्रात प्रवेश करता येणार नाही.

12) कराराच्या दरम्यानच्या काळात दरांच्या किंमतीत वाढ झाल्यास कुठल्याही प्रकारे दर वाढविले जाणार नाहीत किंवा तशी मागणी करता येणार नाही.

13) ज्या कालावधीत आहार सेवा सुविधा उपलब्ध नसेल त्या कालावधीमध्ये पर्यायी व्यवस्था करणे बंधनकारक राहील. ती न केल्यास पर्यायी व्यवस्थेसाठी जो खर्च केला जाईल तो देयकांतून वसुल करणेत येईल.

14) कोणतेही कारण न देता आहार सुविधेसाठी केलेला करार केव्हाही संपुष्टात आणण्याचा अधिकार वैद्यकिय अधिक्षक यांनी राखून ठेवलेला आहे.

15) आहार पुरविणेसाठी मंजूर दरपत्रक पुरवठादारास ग्रामिण रुग्णालय वैभववाडी,ता-वैभववाडी आवारामध्ये आहार बनविणेसाठी किचन करिता जागा उपलब्ध करुन दिली जाईल मात्र आहारासाठी लागणारे सर्व साहित्य पुरवठादार यांनी स्वत:उपलब्ध करावयाचे आहे

16) आहार आंतररुग्णांना त्यांच्या बेडजवळ नेऊन दयावयाचा आहे यासाठी स्वतंत्र रक्कम दिली जाणार नाही.

17) आहाराच्या गुणवत्तेचे दैनंदिन निरिक्षण वैदयकिय अधिक्षक/सहा.अधिसेविका/इनचार्ज सिस्टर/आहारतज्ञ आणि कंत्राटदाराचा प्रतिनिधी असलेल्या गुणवत्ता समिती मार्फत करणेत येईल याव्यतिरिक्त जिल्हास्तरीय अधिकारी व समितीमधील कोणताही सदस्य स्वतंत्रपणे गुणवत्ता पडताळणी करेल.

18) दररोज पुरविणेत येणाऱ्या आहाराची आहार पुरविणेपूर्वी रुग्णालयातील अधिकारी/कार्यालयीन कर्मचारी/ नर्सिंग स्टाफ/ आहारतज्ञ यांचेपैकी कोणत्या एका व्यक्तीने चव घेणेसाठी आहार उपलब्ध करुन दयावयाचा असून त्याबाबत स्वतंत्रपणे चव रजिस्टर ठेवावयाचे असून त्यावर संबंधित चव घेणाऱ्याची स्वाक्षरी घेणे बंधनकारक राहिल.

19) प्रत्येक महिन्याला कच्च्या मालाची गुणवत्ता आहारतज्ञांकडून तपासून घ्यावी.

20) दर तीन महिन्यांनी आहार तयार करणारे व पुरविणारे कर्मचारी यांची वैदयाकिय तपासणी करुन घेणेत यावा.

21) बालरुग्ण,क्षयरुग्ण,कर्करुग्ण,जळीतरुग्ण इ. रुग्णांना वैदयकिय अधिक्षक/आहारतज्ञ यांच्या सूचनेनुसार वरील शासन निर्णयामध्ये नमुद आहार पुरविणेत यावा.

22) आहार सेवा पुरविणेकरिता बचत गटास प्रथम प्राधान्य राहिल तदनंतर अनुभवी संस्थेस प्राधान्य देणेत येईल.

## प्रस्तावित प्रमाणित आहार
## प्रवर्ग- प्रौढ रुग्ण (पुरुष,स्त्री)

| खाद्यपदार्थाचे नाव | पुरुष प्रमाण (ग्रॅम/मिली) | स्त्री प्रमाण (ग्रॅम/मिली) | | |
|---|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण स्त्री | गर्भवती स्त्री (अतरिक्त) | स्तनदा स्त्री (अतिरिक्त) |
| तृणधान्य | २७५ | २०० | | |
| गहुपीठ | १६० | ११० | +२५ | +५० |
| तांदुळ | ७० | ६० | | |
| पोहे/रवा/सोजी | ४५ | ३० | | |
| डाळ/उसळ | ८० | ६० | | +२० |
| डाळ | ५० | ४० | | |
| उसळ | ३० | २० | | |
| हिरवी पालेभाजी | १०० | १०० | | |
| फळभाजी | २०० | २०० | | |
| कंदभाजी | १०० | १०० | | |
| मोसमी फळे | १ नग( १००ग्रॅम) | १ नग( १००ग्रॅम) | +१नग( १००ग्रॅम) | +१नग( १००ग्रॅम) |

Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दुध | ३०० मिली | ३०० मिली | +१०० मिली | +१०० मिली |
| साखर/गूळ | २० | २० | +५ | +१० |
| खाद्य तेल | २५ | १५ | +५ | +१० |
| मसाला साहित्य | १० | १० | | |
| मीठ | ५ | ५ | | |
| तेलबीया | ३० | ३० | +१० | +१० |
| चहापाती | ५ | ५ | | |
| अंडी/उसळ | | | +२ नग/२०ग्रॅम | +१ नग/२५ग्रॅम |
| प्रथिने (ग्रॅम) | ६७.२ | ५८.० | +२२.० | +१७.० |
| उष्मांक(किलो कॅलरी) | २१३० | १६९० | +३५० | +६०० |

टिपः

१. मांसाहाराकरिता ७५ ग्रॅम मांस/मासे/अंडी आठवड्यातून दोन वेळा दुपारच्या जेवणातील डाळी ऐवजी देता येईल.

२. उच्चरक्तदाबाच्या रुग्णांसाठी वैद्यकीय सल्ल्यानुसार मीठाचे प्रमाण ठरवावे. (५ ग्रॅम मीठात २ ग्रॅम सोडीयम असते)

३. गर्भवती स्त्री, स्तनदा माता, अस्थीरोगांचे ग्रस्त तसेच शस्त्रक्रियेसाठी भरती झालेले पण शस्त्रक्रिया न झालेल्या रुग्णांकरिता वरीलप्रमाणे आहार देता येईल.

४. डाळी उसळी यामध्ये सर्व प्रकारचे कडधान्य मुग, मटकी, चवळी, हरभरा, वाटाणा, मसुर तसेच डाळींमध्ये तुर, चणा, सालीची मुगडाळ, उडीद, मसुर यासर्व डाळींचा समावेश असावा.

५. प्रौढ रुग्णांकरिता नवीन मानकांप्रमाणे साधारण काम करणारी पुरुष/स्त्री यांचा आहार देण्यात आला आहे.

६. गर्भवती स्त्री व स्तनदा माता यांना गुळ शेंगदाण्याचा लाडू (५० ग्रॅम) अतिरिक्त स्वरुपात देण्यात यावा.

दरपत्रके सिलबंद लखोटयात दिनांक २२/०५/२०२६ दुपारी. २.०० वाजेपर्यंत वैद्यकिय अधिक्षक , ग्रामिण रुग्णालय वैभववाडी,ता-वैभववाडी यांचे कार्यालयिन टपालात आणून देणेची आहेत. सदर दरपत्रके शक्यतः त्याच दिवशी सायं. ५.०० वाजता सहभागी मक्तेदारांचे उपस्थितीत अथवा मक्तेदार उपस्थीत न राहिल्यास त्यांच्या अनुपस्थीतीमध्ये उघडण्यात येतील. संबंधित मक्तेदारांनी दरपत्रक उघडतेवेळी उपस्थित रहाणे अनिवार्य आहे. अनुपस्थित राहणा-या मक्तेदारांचे हरकतीची दखल घेतली जाणार नाही. याची मक्तेदारांनी नोंद घ्यावी.

वैद्यकिय अधिक्षक गट-अ
ग्रामिण रुग्णालय वैभववाडी
ता-वैभववाडी जि-सिंधुदुर्ग

**प्रत –**

**1- कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी**

2-www.nrhm.maharashtra.gov.in
3-www.arogya.maharashtra.gov.in
4-it.nhm-mh@nic.in
प्रत माहितीसाठी सविनय सादर- मा. जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा रुग्णालय सिंधुदुर्ग

Scanned with OKEN Scanner